# University of Mumbai

परीक्षा विभाग,
वाणिज्य निकाल कक्ष,
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई- ४०० ०९८.

क्रं. परीक्षा/वाणिज्य निकाल कक्ष/ ९८९/२०१९

**परिपत्रक :-**

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या निम्नउल्लेखित पदव्युत्तर शिक्षणक्रम चालविणाऱ्या महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालक, यांना सुचित करण्यात येते की, नोव्हेंबर, २०१९ (हिवाळी सत्र २०१९) मध्ये घेण्यात येणाऱ्या खालील नमुद केलेली शिक्षणक्रमाच्या परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in या संकेत स्थळावरुन online घेण्यात येणार आहे.

**1. M.C.A.(VI)(Choice Base)**

उपरोक्त परिक्षांचे अर्ज वेब लिंक वरुन online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | परीक्षा शुल्क | विद्यार्थ्यांने online अर्ज भरण्याची, Inward करण्याची व महाविद्यालयात त्याची प्रिंट सादर करण्याची तारीख | Form Submission Report व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखा |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | २३/१०/२०१९ ते ०६/११/२०१९ | ०८/११/२०१९ |
| २. | विलंब शुल्क रु.१००/-सहित | ०७/११/२०१९ ते १४/११/२०१९ | १६/११/२०१९ |
| ३. | अतिविलंब शुल्क रु.५००/-सहित | १५/११/२०१९ ते १९/११/२०१९ | २१/११/२०१९ |

वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशीलप्रमाणे संबधीत विद्यार्थ्यांनी आपले परीक्षा अर्ज mu.ac.in या संकेत स्थळावर online भरुन त्याची प्रिंट घेऊन आवश्यक कागदापत्रांसह महाविद्यालयात जमा करावेत व संबधीत महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी online भरलेले परीक्षा अर्ज आपल्या Login मध्ये Inward करुन घ्यावेत व सदर Inward झालेल्या परीक्षां अर्जाचे Form Submission Report काढून तो Report व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावेत.पोस्टाने अथवा कुरिअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाही. तसेच परीक्षा अर्जाच्या प्रती (Examination Form Prints) विद्यापीठाकडे पाठवू नयेत.

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ०६ वाजता (**२१/११/२०१९ रोजी सायं. ६ वा.**) Inward link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिली जाणार नाही या बाबींची नोंद घेण्यात यावी.

# University of Mumbai



परीक्षा अर्ज Inward झाल्यानंतर कोणतीही दुरुस्ती करता येणार नाही, या मुळे परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबधित विद्यार्थ्याचे नाव (इंग्रजी व मराठी या दोन्ही लिपीत), विषय व इतर सर्व माहिती अचूक व बरोबर यांची खात्री करुन घ्यावी.

ज्या विद्यार्थ्याचे परीक्षा आवेदनपत्र Online पद्धतीने Inward झाले नाही तर त्या विद्यार्थ्याने आपले आवेदन पत्र पारंपारींक पद्धतीने (Hard Copy स्वरुपात) वरील नमुद केलेल्या तारखांच्या वेळापत्रकाप्रमाणे भरुन विद्यापीठाकडे पाठवावेत.

उपरोक्त अभ्यासक्रमाची सुधारित परीक्षा फी बाबत, परिपत्राक क्रमांक. **परीक्षा/फी/१५/२०१८, दि. ३१ जानेवारी, २०१८** च्या नुसार परीक्षा शुल्क स्विकारावी तसेच **गुणपत्रिकेचे** रु.५०/- व Online form रु.१०/- शुल्क स्विकारावी. तसेच M.C.A.(Sem.VI)(CBSGS) या परीक्षेसाठी नियमित म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्का मध्ये **रु.२५०/-** पदवी प्रमाणपत्र शुल्क भरणे अनिवार्य आहे.

(परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना मराठी (देवनागरी) नाव नमूद करणे बंधनकारक आहे व तेच नाव त्यांच्या पदवी (Degree) प्रमाणपत्रात छापण्यात येईल. त्यामुळे नाव नमुद करताना चूक होणार नाही याची दक्षता घ्यावी.)

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींची तंतोतंत पालन करण्यात यावे.

वरील सर्व बाबींची नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

(Web Link :- **mu.ac.in ---→ exam & result ----→ examination --→ EXAM FORMS (All Exam) ----→** follow the instructions given on the page)

(डॉ विनोद पाटील)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई.
दि. २२/१०/२०१९

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व संबंधीत महाविद्यालयांचे प्राचार्य /संचालक

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग व वित व लेखा विभाग
३. सहायक कुलसचिव, रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र

ब. प्रत माहितीसाठी अग्रेषित :-

४. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
५. मा. कुलगुरु यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२
६. मा. प्र. कुलगुरु, मा. संचालक बीसीयुडी, कुलसचिव व परीक्षा नियंत्रक यांचे स्विय सहायक. यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०० ०३२

(डॉ विनोद पाटील)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई.
दि. २२/१०/२०१९

22/10/19
22/10/19
22/10/19
22/10/19